पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **१९/०७/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१९/०७/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.काळे उषा दिलीप
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक सर्व शाळांमध्ये कारगील विजय दिवस साजरा करणेबाबत – मा.शारदा सोनवणे, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०९/०७/२०१८ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १९/०७/२०१८

सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ :- मा.शारदा सोनवणे, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या मराठी, उर्दु, हिंदी माध्यमाच्या एकूण १०५ शाळा कार्यरत आहेत व माध्यमिक विभागाच्या एकूण १८ शाळा कार्यरत आहेत. मनपाच्या या सर्व शाळांमध्ये कारगील युध्दामध्ये मिळविलेल्या विजयाचे व शहीद झालेल्या जवानांना स्मरुन व त्यांची एक शालेय विद्यार्थ्यांना जाणीव होणे गरजेचे आहे जेणेकरुन या विद्यार्थ्यांना आपल्या देशाचा अभिमान जागृत करणेकरीता, कारगील विजय दिवस म्हणून प्रत्येक वर्षी दिनांक २६ जुलै रोजी शालेय वेळेत साजरा करणेत येऊन मुख्याध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांना याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन करणेकामी सर्व शाळांना परिपत्रक काढणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४५७/२०१८
दिनांक : १९/०७/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc